सन २०१८-१९ च्या पाणी टंचाई कालावधीसाठी चिखली शहर, जिल्हा बुलडाणा येथील पाणी टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१९/प्र.क्र. ६४/पापु १४

गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: १४ मे, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः टंचाई २००८/ प्र.क्र. १४९/पापु १४, दिनांक २१.८.२००९
२) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे क्रमांक प्रासंनप /सलेअ-३/कावि-७२/२०१९, दिनांक १२.०४.२०१९ चे पत्र व प्रस्ताव
३) शासन पत्र, क्रमांक: स्थासबै २०१८/प्र.क्र. २०१/पापु १४, दिनांक १० मे, २०१९ (बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सन २०१८-१९ च्या पाणी टंचाई कालावधीसाठी चिखली शहर तातडीची पाणीपुरवठा योजना, जिल्हा बुलडाणा या योजनेच्या रु. ७१.३४ लाख रकमेच्या कामास प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव नागरी तथा ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तातडीच्या पाणीपुरवठा योजनांना/ उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखालील स्थायी समितीच्या दिनांक ०९ मे, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून प्राप्त चिखली शहरात पाणीपुरवठा करण्यासाठी पेनटाकळी धरणात इंटेकवेल पासून नदीपात्रापर्यंत चर (अप्रोच चॅनल) वरुन

तात्पुरती पाणी पुरवठा योजनेचा समावेश असलेल्या प्रस्तावावर दि. ०९ मे, २०१९ रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन स्थायी समितीने रु. ७१.३४ लाख एवढ्या किंमतीच्या प्रस्तावास मंजूरी दिली. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून प्राप्त चिखली शहर तातडीची पाणीपुरवठा योजना, जिल्हा बुलडाणा या योजनेचा एकुण रुपये ७१.३४ लाख (अक्षरी रुपये एकाहत्तर लाख चौतीस हजार फक्त) इतक्या किंमतीच्या प्रस्तावास दि. ०९ मे, २०१९ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यामुळे या आदेशान्वये सदर प्रस्तावास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, बुलडाण यांनी चिखली शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्व प्रथम घोषित करावे.

२) सदर योजनेची अंमलबजावणी नगर परिषद, चिखली यांच्या मार्फत करणे आवश्यक राहील.

३) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. जादा किंमतीच्या निविदा स्वीकृत करण्यात येऊ नयेत.

४) योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी. योजनेची किंमत वाढल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

५) निविदा प्रक्रीया दिनांक २९ मे, २०१९ पर्यंत पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. या दिनांका पर्यंत कार्यारंभ आदेश न दिल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.

६) योजनेचे काम दिनांक १५ जून, २०१९ या कालावधीतच पूर्ण करुन योजनेतून पाणी पुरवठा सुरु होणे आवश्यक आहे. तथापि या दिनांकापर्यंत या योजनेतून पाणी पुरवठा सुरु न झाल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.

७) सदर योजनेच्या एकूण रुपये ७१.३४ लाख खर्चाच्या ९०% म्हणजेच रुपये ६४.२१ लाख इतके अनुदान शासनाद्वारे उपलब्ध करुन दिले जाईल. उर्वरीत रक्कम म्हणजेच योजनेच्या १० % रक्कम रुपये ७.१३ लाख लोकवर्गणी म्हणून नगर पालिका, चिखली यांनी भरावयाची आहे.

८) नगरपरिषदेच्या हिश्श्यापोटी सदर रक्कम प्रथमत: खर्ची टाकावी त्यानंतरच उर्वरित निधी विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे मार्फत नगरपरिषद, चिखली यांना वितरीत करण्यात यावा.

९) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्यामार्फत सदर योजनेकरिता योजनेच्या सुरुवातीस ५०% इतका निधी मुख्याधिकारी, नगर पालिका, चिखली यांना उपलब्ध करुन द्यावा. उर्वरित ३०% निधी विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर योजनेची प्रगती आढावा विचारात घेऊन वितरीत करावा. उर्वरित २०% निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

१०) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रियेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याच्या आकस्मिक निकडीच्या पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन केलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक ०९ मे, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५१३११२३२९०२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

YASHWANT TEDGYA PADVI

Digitally signed by YASHWANT TEDGYA PADVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=42f023d235c1f55c387492762e66530fd58085d2893f88445cf00fc7709a8080, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=c96ec3b84dfb89ca1fbee688d0dbc9e15c61e7e091602f1cc5c94657fc4d9c86, ou=WSSD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=YASHWANT TEDGYA PADVI
Date: 2019.05.14 17:46:51 +05'30'

(य.टे. पाडवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई -३२

२. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
८. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
९. विभागीय आयुक्त, अमरावती
१०.जिल्हाधिकारी, बुलडाणा
११.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती
१२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बुलडाणा
१३. मुख्याधिकारी, नगरपरिषद, चिखली
१४. मा. मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१५. मा. राज्यमंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१६. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१७.उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१८. पापु १४ (निवडनस्ती)